# चौथ्या टप्प्यातील नॅक मूल्यांकन १५ मार्चपासून

कोल्हापूर : गत वेळेसच्या नॅक मूल्यांकनात शिवाजी विद्यापीठाला 'ए' मानांकन मिळाले होते. त्यानंतर विद्यापीठाने पाच वर्षात मूल्यांकनातील त्रुटींचा अभ्यास करुन त्यांची पूर्तता केली. डिसेंबर २०१९ मध्ये विद्यापीठाची नॅक मूल्यांकनाची मुदत संपली असून मार्च २०२० पर्यंत नॅकचे मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु कोरोना संसर्गामुळे नॅक टीम विद्यापीठाची पाहणी करु शकली नाही. या मूल्यांकनाला १५ मार्चपासून सुरुवात होणार असून १७ मार्च पर्यंत पाहणी केली जाणार आहे.

कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांचे सादरीकरण झाले आहे. १५ ते १७ मार्च दरम्यान विद्यापीठाचे एक हजार गुणांचे मूल्यांकन होणार आहे. त्यापैकी ७०० गुणांची संख्यात्मक माहिती नॅक बेंगलोरच्या पोर्टलवर पाठविण्यात आले आहे. त्यानुसार त्याचे गुणांकन होणार आहे. ३०० गुणांसाठी प्रत्यक्ष मार्च महिन्यात नॅकची टीम विद्यापीठाची पाहणी करणार आहे. यात अधिविभाग भेटी, विद्यार्थी,पालक

## नॅकच्या अनुषंगाने विद्यापीठाची तयारी

विद्यापीठाची नॅक मूल्यांकनाची मुदत संपली आहे. कोरोनामुळे नॅक मूल्यांकन होऊ शकले नसले तरी प्रत्यक्षात नॅकची तयारी सुरु होती. मार्च महिन्यात नॅकची टीम विद्यापीठाची पाहणी करणार आहे. त्याअनुषंगाने तयारी सुरु आहे.

– डॉ. एम. एस. देशमुख, संचालक,
शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता व हमी कक्ष

# वर्ग सुरू करण्यासाठी महाविद्यालये सज्ज

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कोरोनाचा संसर्ग कमी होत असताना पदवी व पदव्युत्तरचे वर्ग सुरू करण्याची मागणी होत आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करून २० जानेवारीपर्यंत महाविद्यालये सुरू करण्याची घोषणा प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या बैठकीत केली आहे.

या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ अधिविभाग आणि परिक्षेत्रातील महाविद्यालयांनी पूर्णपणे तयारी केली आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने वर्ग खोल्यांची स्वच्छता, सॅनिटायझेशन केले आहे. विद्यापीठातील अधिविभाग सुरु करण्याची तयारी पूर्ण झाली आहे. परंतू क्वारंटाईन सेंटरसाठी जिल्हा प्रशासनाने ताब्यात घेतलेली वसतिगृह अद्याप विद्यापीठाच्या ताब्यात दिलेली नाहीत. शासनाने महाविद्यालये सुरु करण्याचा निर्णय घेतला तर अकरावीचे वर्ग सुरू होण्यापुर्वीच महाविद्यालय प्रशासनाने अगोदरच वर्ग खोल्यांची स्वच्छता आणि सॅनिटायझेशन केले आहे. ५० टक्के क्षमतेने वर्ग सुरू करण्यासाठी महाविद्यालये सज्ज आहेत. ऑनलाईन विज्ञान विभागाची प्रॅक्टीकल घेणे शक्य नाही.

## शासन आदेशाची प्रतिक्षा...

विद्यार्थी वर्गात आले तर विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन करणे सहज शक्य होणार आहे. विज्ञान विभागाची प्रॅक्टीकल आणि वाणिज्य शाखेचा अकौंटंट विषयाचे शिक्षण देणेही सोपे जाईल. महाविद्यालय प्रशासनाने पूर्ण तयारी केली असून महाविद्यालय सुरू करण्यासाठी शासन आदेश आवश्यक आहे.

**डॉ. राजेखान शानेदिवाण**
**(प्राचार्य, शहाजी कॉलेज)**

## विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने पूर्ण तयारी

ऑनलाईन शिक्षण सुरू असले तरी घरात बसून शिक्षण घेणे विद्यार्थ्यांच्या पचणी पडत नाही. शासनाने महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला तर ५० टक्के उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती काळजी घेवून महाविद्यालय सुरू करण्याची तयारी केली आहे.

**डॉ. अण्णासाहेब खेमणार**
**(प्राचार्य, राजाराम कॉलेज)**



**कोल्हापूर : वि. स. खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. पी. एस. पाटील.**

# वि. स. खांडेकर यांच्या साहित्यातून सकारात्मक ऊर्जा : डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. ११ : 'वि. स. खांडेकर यांचे साहित्य निराशेवर मात करण्यास उपयुक्त आहे. त्यांच्या साहित्यातून सकारात्मक उर्जा मिळते,' असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठाचे पहिले परितोषिक मिळवून देणारे साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या १२३ व्या जयंती दिनानिमित्त वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे कार्यक्रम झाला.

ते म्हणाले, "खांडेकर यांचे साहित्य अजरामर आहे. कोरोनाच्या काळामध्ये नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी वि. स. खांडेकरांचे साहित्यच उपयुक्त ठरले आहे. 'क्रौंचवध', 'कांचनमृग', 'ययाती' या कादंबऱ्या म्हणजे मानवी जीवनाच्या संघर्षावरती केलेले भाष्य आहे. ही ग्रंथसंपदा अधिकाधिक लोकांपर्यंत कशा पद्धतीने पोहचवता येईल."

प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

# थकीत शिष्यवृत्तीप्रकरणी बैठक घ्या

## डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर प्रवेश विभागाला सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिष्यवृत्ती थकीत राहण्याची कारणे शोधून त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी दोन दिवसांत पदव्युत्तर प्रवेश विभागाची बैठक घ्या, अशी सूचना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी केली.

पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची एक कोटी रुपयांची रक्कम थकीत आहे. वर्षभरापासून विद्यार्थी या शिष्यवृत्तीची प्रतीक्षा करत आहेत. त्याकडे 'लोकमत'ने 'शिवाजी विद्यापीठातील पाच हजार विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती थकीत' या वृत्ताद्वारे सोमवारी लक्ष वेधले. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या (मनविसे) कोल्हापूर शाखेने कुलगुरु डॉ. शिर्के यांना निवेदन दिले. विद्यार्थ्यांना शासनामार्फत अनेक शिष्यवृत्ती २०१८-२०१९ पासून मिळालेल्या नाहीत. त्याची दखल घेऊन तत्काळ या शिष्यवृतीची रक्कम जमा करावी, अशी मागणी 'मनविसे'च्या शिष्टमंडळाने केली. त्याबाबतचे निवेदन या शिष्टमंडळाने वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांना दिले. त्यावर पदव्युत्तर प्रवेश विभागाची बैठक दोन दिवसांमध्ये घेऊन पुढील कार्यवाही करण्याची सूचना कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठ प्रशासनाला केली.१५ दिवसांत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीची रक्कम मिळावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा 'मनविसे'चे शहराध्यक्ष मंदार पाटील यांनी दिला.

### निधीसाठी शासनाकडे पाठपुरावा

शिष्यवृत्ती प्रस्तावात आधार कार्डचा क्रमांक अद्यावत केला नसल्याने गेल्यावर्षीच्या काही विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती थकीत आहे. 'आधार' अद्यावत करण्याबाबत महाविद्यालयांना सूचना केली आहे. या वर्षातील शिष्यवृत्तीसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ४९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत. ज्या शिष्यवृत्तींसाठी शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही, तो मिळविण्यासाठी पाठपुरावा सुरु असल्याचे कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे यांनी सांगितले.

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रातील उच्च शिक्षण देणारा स्वतःचा वेगळा अधिविभाग असणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ आहे. विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राची ओळख करून देऊन वैयक्तिक विकास व करिअर निवडण्याच्या अनुषंगाने प्लेसमेंट सेल प्रयत्नशील आहे. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग (६), मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधून (५), कम्प्युटर सायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी (२२), फूड टेक्नॉलॉजी (४) व केमिकल इंजिनिअरिंग (५) विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड झाली असून लाखो रुपयांचे पॅकेज मिळाले आहे, अशी माहिती 'डीओटी'चे संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी दिली.

# शिवाजी विद्यापीठाचे १५ मार्चपासून नॅक मूल्यांकन

## तयारी सुरू; विविध समित्यांच्या बैठका



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे चौथ्या टप्प्यातील नॅक मूल्यांकन १५ मार्चपासून सुरू होणार आहे. नॅक बेंगलोरची टीम विद्यापीठाची पाहणी करून असणाऱ्या विविध घटकांशी संवाद साधणार आहे. विद्यापीठाकडून याची तयारी सुरू झाली असून, विविध समित्यांच्या बैठका होत आहेत.

गत वेळेसच्या नॅक मूल्यांकनात विद्यापीठास 'ए' मानांकन मिळाले होते. त्यानंतर विद्यापीठाने पाच वर्षांत मूल्यांकनातील त्रुटींचा अभ्यास करून त्यांची पूर्तता केली. डिसेंबर २०१९ मध्ये मुदत संपली आहे.

नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांचे सादरीकरण झाले आहे. १५ ते १७ मार्चदरम्यान विद्यापीठाचे एक हजार गुणांचे मूल्यांकन होणार आहे. त्यापैकी ७०० गुणांची संख्यात्मक माहिती नॅक बेंगलोरच्या पोर्टलवर पाठविण्यात आली आहे. त्यानुसार त्याचे गुणांकन होणार आहे. ३०० गुणांसाठी प्रत्यक्ष मार्च महिन्यात नॅकची टीम विद्यापीठाची पाहणी करणार आहे. यात अधिविभाग भेटी, विद्यार्थी, पालक संवाद, भौतिक सुविधांची पूर्तता, तंत्रज्ञानाचा वापर, संशोधनामधील प्रगती आदी ३६ मुद्द्यांचा समावेश आहे. विद्यापीठाने नॅक मूल्यांकनाची जोरदार तयारी सुरू केली आहे.

> नॅक मूल्यांकनाची मुदत संपली आहे. कोरोनामुळे मूल्लांकन होऊ शकले नसले तरी प्रत्यक्षात तयारी सुरू होती. मार्च महिन्यात नॅकची टीम विद्यापीठाची पाहणी करणार आहे. त्याअनुषंगाने तयारी सुरू आहे.
>
> **- डॉ. एम. एस. देशमुख,**
> संचालक, शिवाजी विद्यापीठ
> गुणवत्ता व हमी कक्ष

# तंत्रशिक्षण विभागातील विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील २०१९-२० मध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून नामवंत कंपन्यांमध्ये ४२ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना लाखो रुपयांचे पॅकेज मिळाले असून औद्योगिक क्षेत्रात या विभागाच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाची मान उंचावली आहे. देश-विदेशात या विभागातील विद्यार्थ्यांची फूड इंडस्ट्रीसह, टेक्नॉलॉजीमध्ये निवड झाली आहे. यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग: ६, मेकॅनिकल इंजिनिअरींग: ५, कंम्प्युटर सायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी: २२, फूड टेक्नॉलॉजी : ४, आणि केमिकल इंजिनिअरींग : ५ विद्यार्थ्यांची निवड केली आहे. या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांचे मार्गदर्शन लाभले.

# विद्यापीठाचे शुक्रवारपासून नॅक मूल्यांकन

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाचे इन्स्टिट्यूशन इन्फॉर्मेशन फॉर क्वालिटी अॅश्युरन्स (नॅक) मूल्यांकन करण्यासाठी समिती शुक्रवारी (ता. १५) येणार आहे. मूल्यांकन रविवार (ता. १७) पर्यंत सुरू राहाणार आहे. नॅक मुल्यांकन पद्धत बदलल्यानंतर होणाऱ्या मूल्यांकनाच्या पहिल्या टप्प्यातच शिवाजी विद्यापीठाचे मूल्यांकन केले जाणार आहे.

मूल्यांकनातील त्यांच्या गुणांनुसार विद्यापीठ अनुगान आयोगाचे अनुदान निश्चित होते. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात नॅक गुणवत्तेला महत्त्व आहे. कोरोनामुळे नॅक मुल्यांकन तब्बल नऊ महिने पुढे गेले होते. बदललेल्या मुल्यांकन पद्धतीनुसार विद्यापीठाने गुणवत्ता हमी कक्षाची स्थापना करून विद्यापीठाशी संबंधित सर्व माहिती संकलित करण्यात आली.

# विद्यापीठ अध्यादेश तपासणी पुनर्गठन समिती सदस्यपदी डॉ. शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अध्यादेश व परिनियमांच्या तपासणीसाठीच्या समितीचे राज्य सरकारने पुनर्गठन केले आहे. यात शिवाजी विद्यापीठातील उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

अध्यादेश व परिनियमांची तपासणी करणाऱ्या समितीमध्ये आठ सदस्यांचा समावेश आहे. उच्चशिक्षण संचालक अध्यक्ष आहेत. अध्यादेशांना मान्यता देण्यापूर्वी तपासणी, छाननी, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांचे परिनियम, आदेश तपासणी करून राज्य सरकारला शिफारसी करण्याचे काम समिती करणार आहे.